# मिरा भाईंदर महानगरपालिका

**// इतिवृत्तांत //**

**श्री. संजय श्रीपतराव काटकर,** आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली सोमवार दि.10/2/2025 रोजी सायं. 5.00 वा. स्थायी समिती, सभागृह येथे व्हीसी व्दारे सर्व खाते प्रमुख यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | सात कलमी कृती कार्यक्रम कामाचा आढावा **मंगळवार व गुरुवार स्थळ पहाणी अहवाल** | सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख | सात कलमी कार्यक्रमांतर्गत नेमून दिलेल्या खाते प्रमुखांनी त्यांच्या वॉर्ड, प्रभागात स्थळ पहाणी करुन त्यांचा अहवाल फोटोसह उपायुक्त (मु.) यांचेकडे एकत्रिकरणासाठी सादर करावा. शासनाकडून प्राप्त निधीतून सुरु असलेल्या विकास कामांना भेटी दिल्या आहेत त्यांचे फोटो एकत्रित संग्रही करण्यासाठी उपायुक्त (मु.) यांचेकडे सादर करावेत. | दि.17/2/25 |
| 2. | महानगरपालिकेचे वार्षिक आयईसीचे जनजागृती नियोजन करणे. | सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख | प्रत्येक विभागाने त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम, उपक्रम यांची यादी तयार करुन बाबनिहाय IEC बाबत नियोजन करावे. अंतिम प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा. | दि.17/2/25 |
| 3. | नियमांचे पालन न करणारे तबेल्यांवर कार्यवाही करणे **कॅटल कंट्रोल ॲक्ट** 1971 **ॲक्ट** व जनावरां संदर्भात धोरण निश्चीत करणे. | श्री.संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त | शहरात अतित्वात असलेले तबेले हे 30-35 वर्षापुर्वीचे असून त्यानंतर शहरीकरण झाले असल्याने सदर तबेल्यांना स्थलांतरीत करावयाचे झाल्यास शासनाकडे अभिप्राय मागविणे आवश्यक असल्याचे अति. आयुक्त यांनी बैठकीत निर्दशनास आणून दिले. त्यानुसार | दि.17/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | शासनाकडे पत्र व्यवहार करुन पाठपुरावा करावा. | |
| 4. | शहरातील बोगस डॉक्टरांचा शोध आणि कारवाई. | श्री. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त | तपासणी मध्ये आढळून आलेल्या ज्या 2 बोगस डॉक्टरावर एफआयआर दाखल करुन, केलेल्या कार्यवाहीची प्रसिद्धी द्यावी. तसेच अजून सखोल चौकशी करून शहरातील इतर बोगस डॉक्टराचा शोध घ्यावा. | दि.11/2/25 |
| 5. | स्टॉल कार्यवाही (हिरव्या रंगाने निशाणी) | श्री.संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्रीम. कल्पीता पिंपळे, उपायुक्त (मु.) | मा. मुख्यमंत्री महोद्यांचे ७ कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत स्टेशन परिसर स्वच्छतेचा एक भाग म्हणून भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन लगत असलेल्या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करावी. | दि.12/2/25 |
| 6. | जन्म-मृत्यू दाखलेबाबत | श्री.संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | नागरीकांना स्वयंप्रेरणेने जन्म दाखले उपलब्ध करुन देणेबाबत शासकीय बाबी तपासून/ विचारात घेवून निर्णय घ्यावा. | दि.17/2/25 |
| 7. | फेरीवाला धोरण **(आर ओ नेमणे)** | श्री.संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्रीम. कल्पीता पिंपळे,उपायुक्त (मु.) | फेरीवाल्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कामगार आयुक्तांकडे संपर्क साधून त्वरीत आर ओ नेमावेत. | दि.17/2/25 |
| 8. | मोठया संकुलात कचरा प्रक्रिया प्रकल्प राबविणे. | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त | ज्या मोठया संकुलात कचरा प्रक्रिया प्रकल्प राबविण्यात येत आहे त्यांचे सादरीकरण तयार करुन मंगळवारी प्रसिध्दीसाठी सादर करावे. | दि.11/2/25 |
| 9. | शहरातील स्वीट मार्ट चे मैपिंग करणे आणि त्यासाठी स्वतंत्र टीम नियुक्त करणे. **अहवाल** | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | शहरातील स्वीट मार्ट यांच्या परिसरात अद्यापही स्वच्छता बाळगली जात नसल्याचे दिसून येते. यावर नियंत्रणासाठी स्वतंत्र टिमची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचेकडून पाहिजे त्या प्रमाणात कारवाई होत नसल्याचे दिसते. | दि.17/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | करीता शहरातील स्वीट मार्टचे मॅपिंग करणे व नेमलेल्या टिमवर नियंत्रण ठेवण्याकरिता मोबाईल ॲपचा वापर करावा. प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जॉब चार्ट तयार करावा. | |
| 10. | know your donation साठी लॉजिस्टिक्स सपोर्ट साठी शहरातील कार्यरत स्विगी/झोमॅटो/पोर्टर व तत्सम संस्थांची बैठक आयोजित करणे. | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | know your donation च्या लॉजिस्टिक्स सपोर्ट साठी शहरातील कार्यरत स्विगी/झोमॅटो/पोर्टर व तत्सम संस्था याची सहाय्य घेणे व त्यासाठी येणारा खर्चाची मागणी SBM कडे करणे व निधी प्राप्तीसाठी सातत्याने पाठपुरावा करावा. | दि.12/2/25 |
| 11. | नविन वर्षात CSR राबविणे तसेच मागील वर्षात CSR अंतर्गत प्राप्त निधी व त्यांचा विनीयोग बाबत अहवाल | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | मागील वर्षात CSR अंतर्गत प्राप्त निधी व त्या निधीचा विनीयोग अहवाल सादर करा. | दि.17/2/25 |
| 12. | गतीशक्ती अभियान | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | संबंधित विभाग/संस्था यांचेशी विचार विनिमय करुन पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा. | दि.16/2/25 |
| 13. | बिसलेरी प्रकल्प सद्यस्थिती (रॅग्पिकर्स महिला) | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | खातेप्रमुखांनी प्रकल्पाकडे विशेष लक्ष द्यावे. नाविन्यता कक्षाने पुढील बैठकीत आढावा घेवून अहवाल सादर करावा. | दि.16/2/25 |
| 14. | महानगरपालिकेचा विभागवार वार्षिक अहवाल प्रकाशित करणे. | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | ज्या विभागांनी अद्याप पर्यंत माहीती उपलब्ध करुन दिली नाही त्यांना 2 दिवसात माहिती सादर करण्याच्या सुचना द्याव्यात. तसेच मुख्यलेखाधिकारी हे अद्यापपर्यंत अनभिज्ञ असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. तदनंतरही विहीत मुदतीत माहिती न दिल्यास संबंधित | दि.16/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | विभाग प्रमुख/खाते प्रमुखांना नोटीस बजावण्यात याव्यात. | |
| 15. | रस्त्यावरील कचरा कलेक्शन पॉईंटची संख्या कमी करणे. | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | कचरा कलेक्शन पॉईंटचे जीओ मॅपिंग करावे.<br>तसेच कचरा कलेक्शनसाठी **फार्मिंग बेड** घेण्यात यावेत. | दि.24/2/25 |
| 16. | प्लाझमा टेक्नॉलॉजी प्रकल्प (नवीन प्रकल्पाचा DPR तयार करणे.) | श्री. सचिन बांगर, उपायुक्त, प्र.अति. आयुक्त | कार्यादेश देण्यापर्यंतची कार्यवाही पार पाडावी. | दि. 17/2/25 |
| 17. | रमजान करीता सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देणे बाबत | श्री. सचिन बांगर, प्र.अति. आयुक्त | लोकप्रतिनिधीची मागणी व मागील वर्षातील कार्यवाही विचारात घेवून सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव सादर करावा. | दि.17/2/25 |
| 18. | स्वच्छ भारत अभियान पेंटिंग २०२३ चे २०२४-२५ करणे | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त | निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पार पाडावी. | दि.24/2/25 |
| 19. | HR टीमचे कामकाज आढावा | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (मु.) | सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांची दिनांक 1/1/24 ते 31/12/24 या कालावधीतील कार्यविवरण नोंद वही तपासावी.<br>तसेच प्रत्येक विभाग निहाय अधिकारी-कर्मचारी पिरॅमिड तयार करावे. | दि.17/2/25 |
| 20. | डिअर कमिशनर अभियान केलेली कार्यवाही | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे उपायुक्त (मु.) | गुरुवार दि.13/2/25 रोजी निश्चीत केलेल्या 5 सोसायटीच्या बाहेर बॉक्स बसविण्यात येत असल्याचे उपायुक्त (मु.) यांनी बैठकीत सुचित केले.<br>प्राप्त होणाऱ्या सुचना, तक्रारी विचारात घेवून पुढील कार्यवाही पार पाडण्यासाठी तक्रार निवारण समितीने विशेष दखल घ्यावी.<br>अध्यक्षांनी शुक्रवारी समितीची बैठक आयोजित करावी. | दि.24/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 21. | बाप्पा कट्टा प्रसिध्दी व जनजागृती, अर्थसंकल्पातील तरतुद, सुविधा, अनुदान धोरण तयार करणे. | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पीता पिंपळे,उपायुक्त (मु.) | मा. न्यायालयाच्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करणेकरीता आगामी गणेशोत्सवांसाठी पीओपी मुर्ती विक्रेता व कारखानदार यांना नोटीस बजावण्यात याव्यात. | दि.17/2/25 |
| 22. | कर्मचाऱ्यांमार्फत रिल बनविण्याची स्पर्धा (परिपत्रक) | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे उपायुक्त (मु.) | इच्छुक कर्मचाऱ्यांची शुक्रवार दि.14/2/25 रोजी बैठक आयोजित करुन महापालिकेचा दृष्टीकोन लक्षात आणून द्यावा. त्यासाठी त्यांना काही सहकार्य हवे असल्यास विचारात घ्यावे. | दि.17/2/25 |
| 23. | प्रजासत्ताक दिनास गैरहजर कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करणे. (परिपत्रक, कार्यवाही अहवाल) | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (मु.) | नियमातील तरतुद तपासून कार्यवाही प्रस्तावित करावी. | दि.17/2/25 |
| 24. | श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांना घरे देणे. | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (मु.)<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (मिळकत) | सेवा ज्येष्ठतेनुसार ज्या लाभार्थ्यांनी सर्व निकष पार पाडले आहेत, त्यांना त्वरीत घरे उपलब्ध करुन द्यावीत.<br>तसेच जे लाभार्थी निकष पुर्ण करीत नाहीत त्यांना मुदत निश्चीत करुन द्यावी.<br>सफाई कर्मचाऱ्यांना अधिकची घरे उपलब्ध करुन देणेसाठी शासन व म्हाडा यांचेकडे पत्रव्यवहार करावा. आवश्यकता भासल्यास स्थानिक लोकप्रतिनिधींचे सहकार्य घ्यावे. | दि.17/2/25 |
| 25. | काम.कॉम यांचे समवेत कराराचे पुर्नविलोकन करणे. | श्री. सचिन बांगर. प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | गुरुवारी चर्चेसाठी बोलावून घ्यावे. | दि.13/2/25 |
| 26. | शालेय शिक्षक व कर्मचारी यांचे चारित्र्य पडताळणी | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | ज्या 21 शिक्षकांनी अद्यात चारित्र्य पडताळणी दाखल सादर केला नाही त्यांना 1 महिन्याची मुदत | दि.24/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | द्यावी. तसेच ते ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणच्या स्थानिक पोलीस स्टेशनला पत्राव्दारे सुचित करावे. | |
| 27. | विविध विभागात कार्यरत असलेल्या बालवाडी शिक्षिका यांना शिक्षण विभागात वर्ग करणे. | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | माहिती घेवून प्रस्ताव सादर करा. | दि.13/2/25 |
| 28. | नाविन्यता कक्षास साहित्य उपलब्ध करुन देणे. | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पार पाडून साहित्य उपलब्ध करुन द्यावे. | दि.24/2/25 |
| 29. | शिक्षण कॉनक्लेव सद्यस्थिती | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | एप्रिल महिन्यात दिनांक निश्चित करुन शिक्षण कॉनक्लेवसाठी नियोजन करावे. | दि.24/2/25 |
| 30. | कौशल्य केंद्र (टेक महिंद्रा व कोटक) आढावा | श्री. सचिन बांगर, प्र. अति.आयुक्त<br>श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त | कोटक व टेक महिंद्राव्दारे मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याच धर्तीवर महापालिकेतील गुणवंत विद्यार्थी, एकल पालक आणि निराधार असलेल्या विद्यार्थ्यांना 10वी नंतरचे पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य करण्याकरीता आयुक्तांचे स्वाक्षरीने कोटक व टेक महिंद्रा यांना प्रस्ताव द्यावा. | दि.12/2/25 |
| 31. | शाळा आरक्षण विकसित करणे. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता<br>श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | पुढील बैठक इलेव्हेशनसह सादरीकरण ठेवावे | दि.17/2/25 |
| 32. | शहरात पाणीपुरवठा करणारे टँकरव्दारे विक्रेत्यांची नोंदणी करुन त्यांची अनामत रक्कम भरणा करुन घेणे.<br>**(कायदा, विविध धोरण, न्याय निर्णय तपासून अहवाल देणे.)** | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | महापालिका आयुक्तांना शहर वासियांचे आरोग्य हीताच्या दृष्टीने शहरातील खाजगी पुरवठादारकाकडून पुरविण्यात येत असलेल्या पाण्याच्या शुध्दतेबाबत नियंत्रण ठेवता यावे याकरिता ममअ च्या तरतुदी तपासून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. | दि.17/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 33. | घनकचरा व्यवस्थापन / शिक्षण, वैद्यकीय आरोग्य, बेवारस वाहने यांच्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे. **(आरक्षण क्र.290 मधील जागेत शिफ्टींग अहवाल)** | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | आरक्षण जागेत दिवे,पाणी, रस्ते, फेन्सींग, सुरक्षा रक्षकांसाठी केबीन इ. सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात | दि.24/2/25 |
| 34. | 500 मीटर अंतरावर अभ्यासिका उपक्रम धोरण. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | प्रलंबित धोरणाबाबत स्वतंत्र चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 35. | पिना कोला या इमारती मधील भाडेकरुना दिनांक 6 डिसेंबर नंतर मनपाच्या जागेतून काढून जे रहिवाशी संक्रमण शिबीरात रहात आहेत त्यांना सदरची घरे देणे | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | ठेकेदाराकडून लवकरात लवकर बायोमेट्रीक नोंद करुन घ्यावी. तद्नंतर पुढील कार्यवाही करावी. | दि.24/2/25 |
| 36. | महाप्रीत सोबत करार करणे. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | महाप्रीतच्या अधिकाऱ्यासोबत चर्चा करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा. | दि.17/2/25 |
| 37. | मित्र (निती आयोग) या संस्थे समवेत समन्वय साधून करार करणे व विविध प्रकल्प निधीसाठी पाठ पुरावा करणे. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | नाविन्यता कक्षांच्या सहाय्याने प्रकल्प निधीसाठी पाठपुरावा करावा. | दि.17/2/25 |
| 38. | घोडबंदर ते फाऊंटन रस्ता जागा हस्तांतरण | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता<br>श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 39. | मार्केट, इमारत बांधणे. – महारेरा तरतूद, मालमत्ता लिज देणे, महासभेची तरतूद अधिकार – धोरण | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता<br>श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 40. | आर एम सी प्लांट कार्यवाही | श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 41. | शांती नगर आर जी जागेवरील उद्यान हस्तांतरण बाबत | श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 42. | पालिकेने ओसी दिलेल्या इमारतीची यादी/ प्रत कर विभागास देणे. | श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | मा. आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | (दि.1 ऑगस्ट 2023 ते 31/12/24) | | | |
| 43. | 5 गावांचे सिटी सर्वे कामाची सद्यस्थिती | श्री. पुरुषोत्तम शिंदे, ससंनर | मंगळवार दि. 11/2/25 रोजी दुपारी 1.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 44. | अर्थसंकल्प 2025-26 | डॉ. कालीदास जाधव, मुलेअ | मंगळवार दि. 11/2/25 रोजी सायं.5.00 वा. चर्चा करावी. | दि.11/2/25 |
| 45. | विविध गठीत समितीचा प्रलंबित अहवाल | सर्व खाते प्रमुख | सर्व समिती प्रमुखांना माहितीस्तव त्यांचे कार्यालयीन आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.<br>सर्व समिती अध्यक्षांनी लवकरात लवकर आपला अहवाल आयुक्तांकडे सादर करावा. | दि.17/2/25 |
| 46. | आर्थिक वर्षातील उद्दिष्ट व प्रत्यक्षात झालेली वुसलीचा आढावा | सर्व खाते प्रमुख/ विभाग प्रमुख | मुख्यलेखाअधिकारी यांनी इष्टांकानुसार सर्व विभागांच्या वसुलीचा अहवाल 2 दिवसात सादर करावा. | दि.12/2/25 |

उपरोक्त सुचनांची विहीत मुदतीत अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी. पुढी/ल बैठकीत या विषयांचा आढावा घेण्यात येईल.

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
**सर्व संबंधित अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका